**K.T.S.P.MANDAL'S**

# SAHEBRAOJI BUTTEPATIL MAHAVIDYALAYA

RAJGURUNAGAR, TAL-KHED, DIST-PUNE 410501

## Academic Year-2021-22
## Department of Commerce

| Sr. No | Item | Particulars |
|---|---|---|
| 1 | Date | 27/12/2021 |
| 2 | Name of Event | ग्राहक संरक्षण दिन |
| 3 | Venue | विठ्ठलरावजी बुट्टेपाटील सभागृह |
| 4 | Time | 11.00 am to 12.30 pm |
| 5 | Duration of the programme | 1 दिवस |
| 6 | Expense | - |
| 7 | Source of Financial Assistance | - |
| 8 | Names of resource persons | **मा.श्री. रमेशजी टाकळकर** (महसूल समिती प्रमुख, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, मध्य महाराष्ट्र प्रांत) |
| 9 | Name of coordinator | **प्राचार्य डॉ.एच.एम.जरे** (साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरुनगर |
| 10 | Number of participants | 120 |
| 11 | Copy of the programme | - |
| 12 | Curricular/Co-Curricular/Extra-Curricular | Extra-Curricular |
| 13 | Activity belongs to Which Criteria of NAAC | - |

# ग्राहक संरक्षण दिन
# अहवाल

२७/१२/२०२१

आज, सोमवार, दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयतील वाणिज्य विभागाअंतर्गत महाविद्यालयाच्या विठ्ठलरावजी बुट्टेपाटील सभागृहामध्ये राष्ट्रीय ग्राहक संरक्षण दिन निमित्त अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग तहसील कार्यालय, खेड आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायत, खेड तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राहक संरक्षण दिन या कार्यक्रमाचे आयोजन सकाळी ११.०० वाजता करण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते स्व. साहेबरावजी बुट्टेपाटील आणि हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या फोटोचे पूजन करून आजच्या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११.०० वाजता झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. प्रतापराव(नानासाहेब) टाकळकर(उपाध्यक्ष, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, राजगुरुनगर) यांनी स्वीकारले. तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे मा. संजयजी शिंदे (महसूल, नायब तहसीलदार, खेड तालुका) हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक मा. रमेशजी टाकळकर (महसूल समिती प्रमुख, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, मध्य महाराष्ट्र प्रांत) हे होते.

मा.श्री. रमेश जी टाकळकर यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. त्यांनी ग्राहकांचे हक्क, अधिकार, ग्राहक संरक्षण कायदा, ग्राहक न्यायालय तसेच ग्राहक संरक्षण अधिनियम त्याचप्रमाणे ग्राहक संरक्षण कायद्यातील बदल, ग्राहकांनी आपल्या हक्कांचा व अधिकारांचा वापर कसा करावा याविषयी विशेष मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे योग्य असे निरसन केले. त्याचबरोबर आवश्यक असणारे हेल्पलाइन नंबर विद्यार्थ्यांना दिले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. देवानंद नवले (अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, खेड तालुका) यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील कला विभागाचे प्रा.ए.आर.पोखरकर यांनी केले. तसेच या कार्यक्रमासाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. के. आर. पाचारणे, आणि सूर्यवंशी सर तसेच साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच.एम.जरे सर तसेच वाणिज्य विभागातील प्रा. ए. जे बेंडाले, प्रा.टी.बी.वेहळे, प्रा. ए. एस. सांडभोर आणि कला विभागाचे प्रा.ए. आर. पोखरकर व प्रा.एस.एल.बुरुड तसेच श्री.चेतन साळवे देखील उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी देखील उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आभार श्री. अमित कुमार टाकळकर (संघटक, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, खेड तालुका) यांनी मानले आणि कार्यक्रमाची सांगता दुपारी 12.30 वाजता झाली.

प्रा.ए.जे.बेंडाले
वाणिज्य विभाग प्रमुख

# ग्राहक संरक्षण दिन- कार्यक्रमाचे फोटो











REDMI NOTE 8
AVIJEET
2021/12/27 11:29


राष्ट्रीय ग्राहक दिन-प्रबोधन सप्ताह
REDMI NOTE 8
AVIJEET
2021/12/27 11:24


विठ्ठलराव बुट्टेपाटील सभागृह
REDMI NOTE 8
AVIJEET
2021/12/27 11:25